**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# आदिवासी विकासासाठी विकास योजनांचे महत्व

**भाऊसाहेब महिरास**
संशोधक विद्यार्थी, (समाजकार्य)

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

आपल्या देशाची विकसनशील देशाकडून महासत्ता म्हणून प्रस्थापित होण्याकडे वाटचाल सुरू आहे. महासत्तेच्या वाटचालीत 'स्मार्ट सिटी', 'मेक इन इंडीया', 'ग्रामपंचायत विकास आराखडा' व 'आमचा गाव-आमचा विकास' या सारख्या विकासाची व्यापक व दूरदृष्टी असलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून शहरांचा व खेडयांचा सर्वांगीण, स्वयंपूर्ण व शाश्वत विकास करण्यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न होतांना दिसून येत आहेत. विकासाच्या या चढाओढीमध्ये देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ८.६१ टक्के व महाराष्ट्रातील ९.३५ टक्के (२०११ च्या जनगणनेनुसार) आदिवासी जनजाती या सर्व घडामोडी पासून अनभिज्ञ आहे. कारण या आधीच कल्याणकारी राज्य म्हणून महाराष्ट्र शासन समाजातील सर्व घटकांच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक धोरणे, योजना व उपयोजनांची अंमलबजावणी करत आहे. गेल्या ६० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा इतर समाजातील लोकांशी बऱ्यापैकी संपर्क वाढलेला आहे. संस्कार, संस्कृती, आचार-विचार यांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आदिवासींच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्यपूर्वीच्या कालखंडात ज्या समाजसेवकांनी मोलाचे योगदान दिले होते, त्यांच्या सेवेला आजच्या युगात खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. यामध्ये आदिवासी युवा शक्तीचे कार्य वाखाणण्यासारखे आहे. सामाजिक संस्था आणि शासनाने दिलेला मदतीचा हात यांमुळे आदिवासी समाज सुधारणेच्या कार्याला काही प्रमाणात गती मिळत आहे. महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरीती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा आढळत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन हे सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आलेल्या आणि रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. तसे असले तरी सर्वसामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्ये आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो.

आधुनिकीकरणामुळे समाजातील सर्वच घटकांमध्ये अनेक स्थित्यंतरे होत असले तरी अजूनही आदिवासींच्या रोजगाराचा प्रश्न प्रगत समाजाच्या तुलनेने अधिक भीषण आहे. भरमसाठ प्रमाणात होणारी जंगल तोड, झपाटयाने वाढणारे शहरीकरण, जंगलांवर वाढते अतिक्रण अशा अनेक कारणांमुळे आदिवासी समाज जंगलांशिवाय पोरका होत आहे. त्याच्या बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून यामुळे अशिक्षित आदिवासी बाधवांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातीलच एक गंभीर समस्या म्हणजे कुपोषण ही होय. आदिवासींचा रोजगार व उदर भरण-पोषण हे पूर्णपणे जंगल संपत्तीवर अवलंबून असल्याने वर नमूद केल्याप्रमाणे अनेक मार्गांनी जंगल सपंत्तीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. यामुळे आदिवासींच्या हातातील हक्काचे काम म्हणजे जंगल संपत्ती गोंळा करणे व जवळच्या बाजार-हाट मध्ये जावून नाममात्र किंमतीत त्या वस्तू विकणे.  उदा. डिंक, हिरडा, जडीबुटी, वनौषधी आदिंची विक्रीकरुन उदरनिर्वाह करणे जिकरीचे झाले आहे. यातून आदिवासी युवकांचे व्यसनाचे प्रमाणे वाढले आहे व मद्य विक्री व्यवसायाकडे वळू लागले आहेत. यातून कुटूंबाकडे दुर्लक्ष, जुन्या रुढी-परंपरांचे वर्चस्व, प्रगत समाजापासून लांब राहण्याची मानसीकता, संकोचीत वृत्ती यामुळे आदिवासी समाजात रोजगाराचा पूर्णत: अभाव, त्याकरीता होणारे स्थलांतर, प्रचंड दारीद्रय, परिणामी गर्भवती, बाळांतीणीची व बालकांच्या आरोग्याची हेळसांड यातून कुपोषणाचे दुष्ट चक्र सूरु होते व ते बालमूत्यू पर्यंत येवून पोहचते. अशा अनेक अडचणींना आदिवासी समाज सामोरे जात आहे. त्यांच्या विकासाला काही प्रमाणात हातभार लावणाऱ्या विविध शासकीय योजना आहेत.

विकास योजनांची अंमलबजावणी: आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी कल्याणाकरीता अनेक योजना राबवल्या जातात. पण त्यापैकी खरोखरच आदिवासी भागात किती पोहोचतात? हा अभ्यासाचा विषय आहे. विस्थापीत, बेरोगारी, जुन्या रुढी-परंपरा, प्रगत समाजाकडून होणारे शोषण, मागासलेपण, कुपोषण आदी समस्यांनी पोळलेल्या आदिवासींच्या शाश्वत विकासाची त्यांची जबाबदारी सरकारने उचलायला हवी, असे अनेकदा अनेक समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक यांनी सुचवून झाले आहे व त्या धर्तीवर शासनाकडूनही प्रयत्न केले जात आहेत. परंतू योग्य लाभार्थ्यांपर्यंत योग्य योजनांचा लाभ पोहचवणे व योजनांची परीणामकारकता

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वाढविण्यासाठी, लोकसहभाग मिळवण्याकरीता तसेच आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी शासन स्तरावरुन ठोस प्रयत्न करण्याची आजही आवश्यकता आहे. देशातील आदिवासींची एकूण लोकसंख्या पहाता शासकीय प्रयत्न कशाप्रकारे केले जात आहेत याची प्रचिती त्या योजनांचा आढावा घेतल्यास येते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकुण लोकसंख्या १,२१,०५,६९,५७३ एवढी असून त्यापैकी आदिवासी समाजाची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ एवढी आहे. म्हणजेच एकुण लोकसंख्येचे ८.६१ टक्के इतके आहे. भारतातील राज्य निहाय लोकसंख्येचा विचार केला असता त्या-त्या राज्याच्या लोकसंख्येनुसार ५.० टक्क्यापेक्षा कमी आदिवासी समाजाची लोकसंख्या असलेली राज्ये झारखंड, केरळ, तामिळनाडू,उत्तराखंड, उत्तरप्रदेश व बिहार आहेत. ५.१ ते १०.० टक्के असलेली राज्ये हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, दमण व दिव, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक व अंदमान व निकोबार बेट ही आहेत. १०.१ ते २०.० टक्के लोकसंख्या असलेली राज्ये जुम्मू व काश्मिर, राजस्थान, आसाम, गुजरात गोवा ही आहेत. २०.१ ते ४०.० टक्के लोकसंख्या असलेली राज्ये सिक्कीम, मणिपूर, त्रिपूरा, ओरीसा, छत्तीसगड व मध्यप्रदेश ही आहेत. ४०.१ व त्याहुन अधिक लोकसंख्या असलेली राज्ये अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम, मेघालय व लक्षव्दिप इत्यादी आहेत.

देशातील आदिवासी लोकसंख्येचा विचार करता केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अनेक योजनांच्या माध्यमातून आदिवासी विकासाकरीता व्यापक प्रयत्न केले जात आहेत. या योजनांमधील खालील पाच योजना या आदिवासी युवकांना स्वयंरोजगार व समाजशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणाऱ्या आहेत. १.व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, २. स्वयरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना, ३. सैन्य तथा पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण योजना, ४.मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना, ५.अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी.

विकास योजना अंमलबजावणीतील अडचणी: राज्यात आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र ९ टक्के इतक्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. हेतू हा की, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अतिदुर्गम, निर्जन स्थळी वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी जमातीसाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार व निवारा या चार प्रमुख बाबींसंदर्भातील पायाभूत सुविधा योग्य प्रकारे राबविणे आवश्यक आहे. परंतू आदिवासी विकास विभागातील काही अपप्रवृत्तींच्या व्यक्तींमुळे कोणतीही योजना व

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

त्यांचा निधी शेवटच्या माणसापर्यंत पोहचतच नाही.  नवसंजीवन योजना, अंत्योदय धान्य योजना, शेतीविषयक पूरक योजना तसेच खावटी योजनेतील धान्य मागील दाराने ठेकेदारांना हाताशी धरून खुल्या बाजारात किंवा शेजारील राज्यात चढ्या भावाने विकले जाते. आदिवासींच्या नावाने बनावट जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवून शैक्षणिक व शासकीय सेवेत आरक्षणाचा लाभ लुटणारे बिगर आदिवासी समाजही तितकाच जबाबदार आहे, आणि म्हणूनच अर्थसंकल्पातील आदिवासींचा सर्वाधिक निधी बोगस आदिवासी समाजाकडून हडप केला जात आहे. अशा प्रकारे आदिवासी विकासाच्या अनेक योजना असल्या तरी वरील अडचणींमूळे आदिवासी बांधव त्यांच्या हक्कांपासून वंचित रहात आहेत.

आधुनिक काळात आदिवासी मुले-मुली शालेय, तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेऊ लागल्या आहेत. त्यांच्यासाठी शासनातर्फे अनेक योजना, प्रशिक्षण सोयी, कोर्सेस व भत्त्यांची सोय केलेली आहे, पण बेकारीचे वाढते स्वरूप व रोजगार संधीचा अभाव, यामुळे नोकरी शोधताना त्यांनादेखील अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शासनाची मदत किंवा योजना प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत पोहोचतेच असे नाही, म्हणून कलेतून स्वयंरोजगाराकडे वाटचाल, हे एक आशावादी पाऊल ठरू शकते. वर्तमानकाळात बेरोजगारीवरचा एक चांगला उपाय म्हणजे स्वयंरोजगार होय. स्वयंरोजगार तीनप्रकारे करता येतात: १. उच्च आणि तांत्रिक प्रशिक्षण प्राप्त करून, २. गैरसंघटित आणि ग्रामीण क्षेत्रात कृषी किंवा कृषीपुरक व्यवसायांच्या माध्यमातून, ३. स्थानीक साधनांवर आधारीत गृहउद्योगाच्या माध्यमातून.

आदिवासी  समाज वरीलपैकी दुसऱ्या व तीस-या प्रकारच्या स्वयंरोजगारांची निर्मिती करू शकतात व त्यातून इतर अनेक हातांना काम मिळवून देऊ शकतात. याचे दुहेरी फायदे होतील. एक तर, आदिवासींना आर्थिक उत्पन्न प्राप्त होईल आणि दुसरे म्हणजे, आदिवासींच्या कलेची जोपासना करता येईल. आदिवासींना आर्थिक उत्पन्नाचे मार्ग सापडल्यास, त्यातून आदिवासींचे सक्षमीकरण व आदिवासी विकासाच्या समाजशिक्षणाचे ध्येय साध्य करता येईल व आदिवासी विकासाला एक नवी दिशा मिळेल, तसेच स्वयंरोजगारातून पुढील बाबी साध्य होतील: १. आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख साधन उपलब्ध होईल, २. आदिवासी हस्तकला व पारंपरिक वस्तूंची जोपासणा होईल, ३. विशेष प्रशिक्षणाशिवाय या कलांचा प्रसार करणे शक्य होईल, ४. आदिवासी समाजामध्ये संघटितपणा व एकात्मता वाढेल, ५. आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

व जागरूकता निर्माण होईल, ६. आदिवासी समाजाला बाहेरच्या जगाचा परिचय होईल व व्यवहारज्ञानात भर पडेल, ७. कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावल्यामुळे राहाणीमानाचा स्तर उंचावण्यास मदत होऊन ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील, ८. वैचारिक देवाणघेवाणीतून अनेक समस्यांवर प्रकाश टाकता येईल, ९. शिक्षण, प्रशिक्षणाचे प्रमाण वाढून आदिवासी समाजाच्या गुणात्मकतेत भर पडेल, १०. हस्तकलेवर आधारित स्वयंरोजगारामुळे देशाच्या आर्थिक विकासालादेखील हातभार लागेल.

आदिवासी समाजाला अवगत असलेली व परंपरागत कला स्वयंरोजगाराच्या स्वरूपात रूपांतरित करता आली तर त्यांच्यासाठी विकासाचे एक नवे दालन खुले होईल व जीवनाचा कायापालट करणारे ते एक प्रकाशपर्व ठरेल! थोडक्यात, आदिवासी समाज नैसर्गिक साधनसामुग्रीला आपल्या कल्पकतेच्या आधारावर विविध व नित्य उपयोगाच्या वस्तूत रूपांतरित करून हस्तकौशल्याद्वारे त्यांची उपयोगिता वाढवून, बाजारपेठांपर्यंत धाव घेऊ शकतात.

आदिवासी विकासात स्वयंरोजगाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आदिवासींनी त्यांच्या कलांना स्वयंरोजगाराच्या स्वरूपात जगासमोर आणले, तर त्याचे अर्थव्यवस्थेत फार मोठे योगदान ठरेल. ऐवढेच नाही तर ग्रामीण क्षेत्रातील रोजगाराच्या संधीत वाढ होईल, आर्थिक व सामाजिक विषमता कमी होण्यास साहाय्य होईल, उपलब्ध नैसर्गिक सामुग्रीचा पूर्णपणे उपयोग करता येईल, कमी भांडवलाच्या साहाय्याने व्यवसाय सुरू करता येईल, सुबक व कलापूर्ण वस्तूंचे उत्पादन करणे सहज शक्य होईल, युद्धकाळात हस्तकलेवर आधारित उद्योग सुरक्षित राहातील, विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यास हातभार लागेल, शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करता येईल, शेतीला जोडव्यवसायाच्या स्वरूपात व्यवसाय करता येईल. त्यामुळे सुप्त बेकारीचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल, पर्यावरणपूरक व्यवसाय असल्यामुळे प्रदूषणासारखी समस्या निर्माण होणार नाही, आदिवासी कलात्मक वस्तूंची स्वतंत्र ओळख निर्माण होईल, आदिवासी संस्कृतीचे जतन करण्याची प्रेरणा निर्माण होईल, आदिवासी समाजाला शासकीय योजनांचा परिचय होऊन त्याचा लाभ घेता येईल, आदिवासी समाजाद्वारे निर्मित वस्तूंची स्वतंत्र ओळख निर्माण होऊन, त्यांना स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध होतील, देशाच्या एकूण आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास या व्यवसायांचा उपयोग होईल.

आदिवासीबहुल क्षेत्रात आदिवासींच्या रोजगारावर भर दिल्यास, त्यांच्या पारंपारीक व्यवसायातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचे मुल्यावर्धन केल्यास व प्रचार व प्रसार

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

माध्यमातून त्यांना बाजार उपलब्ध करुन दिल्यास आदिवासी समाजाची स्वयंरोजगाराकडे वाटचाल सुरु होईल.

आदिवासींचा शैक्षणिक व सामाजिक विकासाबरोबर आर्थिक विकास समतोल पध्दतीने होण्यासाठी शासनाच्या शैक्षणिक योजना/धोरणांची अंमलबजावणी एकात्मीक स्वरूपात राबविण्यासाठी ग्रामीण व तालुका स्तरावरील शासकीय यंत्रणेतील अधिकारी कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी करून आदिवासी भागात काम करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

स्वयंरोजगार कर्ज योजनेअंतर्गत कर्ज  घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या युवकांना कर्ज मंजूर करताना त्यांनी ज्या व्यवसायाकरिता कर्जाची मागणी केली आहे त्या प्रमाणे युवकांचे गट तयार करून त्यांना त्या व्यवसायांची विस्तृत माहिती द्यावी. यात व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कच्च्या मालाची मुबलक उपलब्धता, मशनरी, जागा, बाजार मागणी तसेच व्यवसायासाठी पूरक वातावरण या सर्व बाबींचे मार्गदर्शन शासनाच्याच प्रशिक्षणात व अनुभवी व्यक्तींच्या मार्फत उपलब्ध करून देणे अनिवार्य असावे. यासाठी आदिवासी प्रकल्प अधिकारी स्तरावरून नियोजन व अंमलबजावणी होऊ शकते.

आदिवासींच्या विकासासंबंधी विविध दृष्टीकोन: स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा विकास कार्यक्रमांची आखणी व विचार सुरू झाला तेव्हा आदिवासींच्या विकासाबद्दल मतमतांतरे पुढे आलीत त्यातली खाली दिलेली तीन प्रमुख मानली जातात. १. विजनवासातच ठेवण्याचे किंवा हस्तक्षेप न करण्याचे धोरण (Policy of Isolation or of Non-interference) २. त्वरित आत्मसातीकरणाचे धोरण (Policy of Assimilation) आणि ३. हळूहळू आणि स्थिर स्वरूपाचे आत्मसातीकरणाचे धोरण (Policy of Slow and Steady Assimilation).

१. विजनवासातच ठेवण्याचे किंवा हस्तक्षेप न करण्याचे धोरण (Policy of Isolation or of Non-interference): ब्रिटिश सत्तेच्या काळातील आदिवासींविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा वारसा म्हणून या धोरणाचे वर्णन करता येईल. आदिवासींना ‘आहेत तसेच राहू द्या’, असा याचा सरळ अर्थ होता. जणू काही मानववंशशास्त्रज्ञांना अभ्यासासाठी नमुने असावेत म्हणून आदिवासींना आहे तसेच राहू द्या. त्यांच्या परंपरागत संस्कृतीचे जतन करण्यासाठी नियोजनकर्त्यांनी त्यांच्या समाजजीवनात काहीही हस्तक्षेप करू नये असे या दृष्टिकोनाच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे होते. डॉ. व्हेरिअर एल्विन यांचे नाव या दृष्टिकोनाच्या पुरस्कर्त्यात घेतले जाते. मात्र ते फारसे बरोबर नाही. वास्तविक नंतरच्या आदिवासी विकास कार्यक्रमात त्यांच्याच अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने आदिवासी विकास

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

कार्यक्राला दिशा दिली. त्यांचे म्हणणे एवढेच होते की, आदिवासींच्या संस्कृतीतल्या चांगल्या वैशिष्टयांचे रक्षण व्हायला हवे. मात्र ते पूर्णपणे आदिवासींच्या विकासाला विरोध करीत होते व त्यांना तसेच राहू द्यावे असा आग्रह करीत असे समजून त्यांच्यावर खूप टीकाही झाल्या, त्या श्री. ए. व्ही. ठक्कर उर्फ ठक्करबाप्पा हे प्रमुख होते.

२. त्वरित आत्मसातीकरणाचे धोरण (Policy of Assimilation): वरील धोरणाच्या अगदि विरुध्द टोकाचे हे धोरण होते. प्रा. डॉ. इरावती कर्वे व त्यांच्या सारख्यांनी याचा पुरस्कार केला. हळूहळू त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यापेक्षा त्वरित आणि थेट त्यांना आपल्या प्रमुख-प्रवाही बाह्य, प्रगत संस्कृतीत सामावून घ्यावे आणि आदिवासींनीही प्रमुख-प्रवाही संस्कृती त्वरित आत्मसात करावी असा त्यांचा आग्रह होता. परंतू यावरही टीका झाली कारण हे शक्यही नव्हते व इष्टही नव्हते.

३. हळूहळू आणि स्थिर स्वरूपाचे आत्मसातीकरणाचे धोरण (Policy of Slow and Steady Assimilation): उपरोक्त उल्लेखित परस्परविरोधी अशा धोरणांचा सुवर्णमध्य काढणारे हे धोरण होते. याला 'पंडीत जवाहरलाल नेहरूंचा दृष्टिकोन' म्हणूनही ओळखले जाते. भारतातल्या राष्ट्रीय जीवनातल्या मुख्य-प्रवाही संस्कृतीत आदिवासींना हळूहळू व त्यांच्यात वैचारिक परिवर्तनाच्या प्रक्रीया घडवून आणून सामील करून घ्यावे असा यातला दृष्टिकोन होता. आदिवासींनी त्यांच्याच पुढाकाराने ही नवीन परिवर्तने स्वीकारावीत, त्यांच्यावर ती लादण्यात येऊ नयेत, चांगल्या परंपरा आणि वैशिष्ट्ये नष्ट होऊ नयेत याचीही काळजी घ्यावी असे हा दृष्टिकोन म्हणतो. याबाबत पंडित नेहरू म्हणतात, "भारत सरकारचा हा निश्चिय आहे की, आदिवासी त्यांच्या स्वत:च्या पात्रता व परंपरांच्या आधारे वाढतील, पुढे येतील." आदिम संस्कृतीतील अभिजात वेशिष्ट्ये व परंपरांचा योग्य तो मान राखून आधुनिक जीवनाचेही लाभ त्यांना मिळावेत अशी त्यांची इच्छा होती.

१. *http://adimculture.wordpress.com*
२. *http://www.censusindia.gov.in*
३. *http://www.marathisrushti.com/articles*
४. आदिवासी विकास प्रशासन, डॉ. एस. जी. देवगांवकर, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
५. माहिती पुस्तिका सन २०११-१२, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
६. सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण, डॉ. शरदचंद्र गोखले, व्हीनस प्रकाशन, पुणे.
७. आदिवासींच्या समस्या विचार आणि विश्लेषण-डॉ. गोविंद गारे, अमृत प्रकाशन, औरंगाबाद.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*